पवित्र कुरआन - सुराह ५७ , आयात १४
दांभिक लोक श्रध्दावंतांना हाक देतील, आम्ही तुमच्याबरोबर नव्हतो का, ते उत्तर देतील होय होता, पण तुम्ही स्वःहून मोहाला बळी पडलात आणि तुम्ही (श्रध्देच्या बाबतीत) धरसोड भूमिका घेतली होती. आणि (पुनरूत्थानाबद्दलही) तुम्ही शंका घेत राहिलात. तसेच तुमच्या निराधार मनोकामनांनी तुमची येथपर्यंत फसवणूक केली की, अल्लाहची आज्ञा अमलात आली आणि त्या फसवणूक करणाऱ्या येथपर्यंत फसवणूक केली की, अल्लाहची आज्ञा अमलात आली आणि त्या फसवणूक करणाऱ्या (सैतान) ने अल्लाहच्या बाबतीत तुमची घोर फसवणूक केली.
जे.के.पार्क परिवार, नंदुरबार
मोफत कुरआन मिळविण्यासाठी संपर्क - ९८९०५६९६५२

देशदूत
नंदुरबार जिल्हा



४२ वर्षीय तरुणावर झोपेतच काळाचा घाला

भरधाव वेगातील ट्रक चार घरांवर धडकला, १०० फुटांपर्यंत तरुणाला फरपटत नेल्याने जागीच मृत्यू, महिला जखमी

■ **शहादा । दि.२८। ता.प्र. -**

तालुक्यातील ब्राम्हणपुरी येथे सोमवारी रात्री १ वाजेच्या सुमारास एका भरधाव वेगाने जाणाऱ्या मोठया ट्रकने रस्त्यालगत असलेल्या चार घरांना जोरदार धडक देत झालेल्या भीषण अपघातात एका ४२ वर्षीय तरुणाला झोपेतच सुमारे १०० फूट फरफटत नेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला तर एक वयोवृध्द महिला गंभीर जखमी झाली आहे. उत्तररात्री घडलेल्या या घटनेने एकच खळबळ उडाली असून निरपराध तरुणाचा बळी गेल्याने सर्वत्र संताप व हळहळ व्यक्त होत आहे.

शहादा-खेतिया रस्त्यावरील ब्राम्हणपुरी गावात खेतियाकडे जाणाऱ्या मोठया ट्रक (क्रमांक डी. डी. ०१ पी.९७३५) ने रस्त्यालगत असलेल्या भाईदास नेवरे यांच्या घरातील पत्र्याच्या शेडसह संजय भिका ठाकरे, विजय माळी, मोहन काळू मराठे, कमलेश तावडे यांच्या घराला जोरदार धडक दिली. यात घराच्या ओट्यावर झोपलेले संजय भिका ठाकरे (वय ४२) यांना सुमारे १०० फूट अंतरापर्यंत भरधाव वेगातील मोठया ट्रकने फरफटत नेले. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला तर शेजारील वयोवृध्द महिला धणाबाई माळी (वय ६५) यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. सुदैवाने कुटुंबातील इतर सदस्य सुखरूप बचावले. अपघात एवढा भीषण होता

की, घरांच्या भिंती, मयत संजय ठाकरे यांची खाट, घराचे पत्रे, झाडाच्या फांद्या, विटांचा खच पडलेला होता. या अपघातात एक मोटरसायकल व कमलेश तावडे यांची टेम्पो यांचेही मोठे नुकसान होऊन भर रस्त्यावर अस्तावस्त अवस्थेत पडलेले होते. अपघाताचा मोठा आवाज ऐकताच स्थानिक लोक अपघातस्थळी पोहोचले आणि विटा व मातीच्या ढिगाऱ्यात अडकलेल्या कुटुंबातील अन्य सदस्यांना बाहेर काढले. जखमी धनाबाई माळी यांना रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले.

दरम्यान, अपघात केल्यानंतर फरार झालेल्या चालकास ग्रामस्थांनी पाठलाग करत खेतिया येथील नागरिकांच्या मदतीने पकडले. घटनेची माहिती मिळताच शहादा पोलीस निरीक्षक निलेश देसले, पोलीस उपनिरीक्षक भूपेंद्र मराठे यांच्यासह म्हसावद पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह शवविच्छेदनासाठी शहादा ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. अपघातात मोठ्या प्रमाणात घरांचे नुकसान झाले असून बाहेर उभे असलेल्या टेम्पो, मोटार सायकलीचे देखील नुकसान झाले आहे . अपघातास जबाबदार कंटेनर चालक बहादूर रतन डवर (वय ३१) रा. ब्राम्हणगाव सेंदला डेअरी ता. गंधवानी जि. धार यांच्याविरोधात मयत संजय ठाकरे यांचे भाऊ युवराज भिका ठाकरे यांच्या फिर्यादीने शहादा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हवालदार युवराज पाटील करीत आहेत.

ब्राह्मणपुरी (ता.शहादा) येथे सोमवारी रात्री १ वाजेच्या सुमारास चार घरांवर धडकलेला ट्रक पहिल्या छायाचित्रात दिसत आहे. नंतरच्या छायाचित्रांमध्ये घर, टेम्पो, मोटारसायकलीचे झालेले नुकसान.

कोळसा व खाण मंत्रालयाच्या एनएलसी इंडियाच्या संचालकपदी नेत्रतज्ज्ञ डॉ.वसंत पाटील

■ **शहादा । ता.प्र. -**

येथील डॉ.वसंत अशोक पाटील यांची केंद्रीय कोळसा व खाण मंत्रालय अंतर्गत एनएलसी इंडिया लिमिटेडच्या संचालकपदी निवड झाली आहे.

शहादा येथील सुदर्शन नेत्रालयाचे नेत्ररोग तज्ञ डॉ. वसंत अशोक पाटील यांची राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या आदेशान्वये केंद्रीय कोळसा व खान मंत्रालय अंतर्गत असलेल्या एनएलसी इंडिया लिमिटेडच्या संचालकपदी निवड करण्यात आली. यापूर्वी देखील डॉ.पाटील यांनी केंद्रीय पोलाद मंत्रालयात संचालक म्हणून काम पाहिले आहे. त्यानंतर त्यांची एनएलसी इंडिया लिमिटेडच्या संचालकपदी निवड झाली आहे. ते कंपनीच्या उच्च यांत्रिकी कृत ओपन कास्ट खाणी प्लांटची कार्पोरेट नियोजन उत्पादन आणि ऑपरेशन यासाठी जबाबदारी पार पाडतील. यामध्ये परदेशी पुरवठादारांची संवाद विविधीकरण उलाढाल आणि नफा या दोन्ही बाबतीत वाढीची वचनबद्धता यांचा समावेश असेल. कंपनीच्या सर्व धोरणात्मक निर्णयांमध्ये आणि परदेशात ते विविध बैठकांसाठी सहभागी होऊन खाणी आणि खाणकामाशी संबंधित सर्व बाबींवर नियंत्रण ठेवतील वसंत पाटील यांच्या या स्तुत्य निवडीबद्दल विविध सामाजिक राजकीय क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे.

नंदुरबार येथील नगरपालिकेत सेवा हक्क दिनानिमित्त शपथ

■ **नंदुरबार । दि.२८। प्रतिनिधी**

येथील नगरपालिकेत सेवा हक्क दिनानिमित्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामूहिक शपथ

घेतली. यावेळी सेवा देण्यासाठी आम्ही सर्व तत्पर राहू अशी शपथ घेण्यात आली.

येथील पालिकेत सेवा हक्क दिनानिमित्त सामूहिक शपथ घेण्यात आली. यावेळी अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी लेखापाल वैशाली जगताप, कार्यालय अधीक्षक सुभाष मराठे, बांधकाम अभियंता गणेश गावित, विद्युत अभियंता राकेशकुमार वाडीले, रेकॉर्ड लिपिक राजेश परदेशी, लेखापाल मनोज परदेशी, संगणक अभियंता निखिल देवरे, लेखापरीक्षक निलेश बोरसे, लिपिक मोतीलाल मराठे, दीपक पाटील, अभियंता अभिजीत मोहिते, आरोग्य निरीक्षक रवी काटे यांच्यासह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

महात्मा बसवेश्वर जन्मोत्सवानिमित्त उद्या प्रतिमापूजन

■ **नंदुरबार । दि.२८। प्रतिनिधी**

शहरातील महात्मा बसवेश्वर नगर, बालवीर



चौकात दि. ३० एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता अक्षय तृतीयेला तिथीनुसार जगतज्योती, थोर समाज सुधारक, क्रांतिसूर्य महात्मा बसवेश्वर जन्मोत्सवानिमित्त प्रतिमा पूजन आणि विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रति वर्षाप्रमाणे यंदाही महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंती उत्सवानिमित्त सायंकाळी सात वाजता प्रतिमा पूजन होईल. तसेच कर्नाटक राज्यातील बसवकल्याण येथुन आणलेल्या समग्र साहित्याचे पुस्तक प्रदर्शन भरविणयात येईल. महात्मा बसवेश्वर जन्मोत्सवाचे आयोजन महाराष्ट्र बसव परिषद नंदुरबार जिल्हा शाखा, महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव समिती, शहीद शिरीषकुमार मित्र मंडळ, वीरशैव लिंगायत गवळी समाज नंदुरबार, श्री काशिनाथ बाबा मंदिर सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने केले आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन महाराष्ट्र बसव परिषदेचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष महादू हिरणवाळे, महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव समितीच्या सुलभा महिरे, सुरेखा वळवी, बी. डी.गोसावी, सुरेश जैन, सदाशिव बोरकर, अतुल पतंगपुरे, प्रकाश घुगरे, जी.एस.गवळी, संभाजी हिरणवाळे, सुदाम हिरणवाळे, राजेंद्र लगडे, अशोक यादबोले, योगेश्वर जळगावकर आणि पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

नवापूर येथे सामूहिक विवाह सोहळा

■ **नवापूर । श. प्र. -**

येथील मन्सूरी सामाजिक संस्थेकडून आयोजित सामुहिक विवाह सोहळ्यात सात जोडपे विवाहबध्द झालेत. राज्यभरातील विविध जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी यांच्या उपस्थितीत या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

आ. चंद्रकांत रघुवंशी, आ.शिरीषकुमार नाईक, आदिवासी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन भरत गावीत, पिरामण अंकलेश्वर येथील मौलाना कारी इलियास, जमीयतुल मन्सूर चे प्रदेश अध्यक्ष आरीफअली मन्सूरी, मन्सूरी जमाअतचे जिल्हा अध्यक्ष हाजी आरीफ मासुम पिंजारी, माजी नगरसेवक आरीफभाई बलेसरिया, माजी विरोधी पक्षनेते नरेंद्र नगराळे, माजी नगरसेवक अजय पाटील, माजी नगरसेवक चंद्रकांत नगराळे, शिवसेना उबाठा गटाचे जिल्हा उपप्रमुख हसमुख पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष मनोहर नगराळे, नवापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष धर्मेश पाटील, शंकर दर्जी, विजय सैन, मन्सुरी जमातचे तालुकाध्यक्ष शकील मन्सूरी यांच्यासह उत्तर महाराष्ट्र विभाग व जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकारी उपस्थित होते.

उधना सुरत, दोंडाईचा, नंदुरबार, सोनगढ व दरभंगा बिहार येथील सात कन्या सोनगढ, निजामपूर, उन सुरत, नवापूर व झंखवाव येथील

वरांसोबत विवाहबद्ध झाले. मौलाना कारी इलियास यांनी सर्व पक्षीय व सर्व धर्मीय मान्यवरांच्या उपस्थितीत हा सामुहिक विवाह सोहळा संपन्न होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. देशात भाईचारा वाढावा, जगात भारत देश महासत्ता म्हणून ओळखला जावा व गुण्यागोविंदाने सर्व देशवासीयांनी समाधानी आयुष्य जगावे या आशयाची प्रार्थना त्यांनी केली. सामुहिक विवाह आजकाल आवश्यक होत चालले असून अश्या सोहळ्यांचे समाजातील इतर घटकांनी अनुकरण करण्याची गरज असल्याचे आ.चंद्रकांत रघुवंशी यांनी सांगितले. समुह विवाहाचे तिसऱ्यांदा हे आयोजन होत असल्याने आयोजकांच्या प्रयत्नांचे आ. शिरीषकुमार नाईक व भरत गावीत यांनी कौतुक करून नवविवाहितांना भावी जीवनाच्या शुभेच्छा दिल्या. मन्सूरी पिंजारी जमातचे प्रदेशाध्यक्ष आरीफअली मन्सूरी, जिल्हाध्यक्ष आरीफ मासुम पिंजारी, जे.के. इंटरनॅशनल फाउंडेशन नंदुरबारचे अध्यक्ष हाजी डॉ. किस्मत शेख यांनी वधू वरांना शुभेच्छा दिल्या.

सामुहिक विवाह सोहळ्यात नाशिक शहर व जिल्हा, अहिल्यानगर जिल्हा, जळगाव जिल्हा, धुळे जिल्हा, मालेगांव शहर, खेतिया, साक्री, सटाणा, पिंपळनेर, नंदुरबार, शहादा, सेलंबा, कुकरमुंडा, शिरपूर, अक्कलकुवा, दोंडाईचा, मोलगी, धडगांव, तळोदा, सुरत, ऊन पाटिया व लिंबायत येथील समाजाचे अग्रणी व नवापूर येथील समाज बांधव, भगिनी उपस्थित होते. सुत्रसंचलन प्रा.डॉ.आय. जी.पठाण यांनी केले. मन्सूरी सामाजिक संस्थेचे तालुकाध्यक्ष शकील मन्सूरी, रियाज अब्दुल मन्सूरी, रियाज जमील मन्सूरी, इमरान लाला मन्सूरी, महेमुद मन्सूरी, जुबेर अब्दुल सत्तार मन्सूरी, सोहेल मन्सुरी, शकील दिलावर मन्सूरी, आरीफ मन्सूरी, हाशिम मन्सूरी, शोएब मन्सूरी, असगर पिंजारी व सहकारी यांनी सामुहिक विवाह सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

बोरद येथे 'वादळ परिवर्तनाचं' कार्यक्रम

स्वरमैफील अन् प्रबोधनात्मक कार्यक्रमाने सारेच भारावले

■ **बोरद । वार्ताहर**

महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त उत्सव समितीच्या

वतीने बोरद येथे एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वादळ परिवर्तनाचं - विद्रोही स्वरांची बहुजन मानवांच्या विचारांची मानवतावादी विचारधारा मांडणारी विचारविधी क्रांतीस्वरमैफील आणि प्रबोधन ज्ञानसंपन्न प्रतिभेचा संगीतमय अविष्कार असे या कार्यक्रमाचे शीर्षक होते. हा कार्यक्रम रविवारी सायंकाळी ६ वाजता जय योगेश्वर मंडळ, शहादा रोड, बोरद येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाचे निर्माते राजेंद्र थोरात होते. उदित नारायण म्हणून प्रसिद्ध असलेले प्रा.डॉ.घनश्याम थोरात (धुळे) यांनी कार्यक्रमाचे प्रभावी सादरीकरण केले. या कार्यक्रमाला परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते, ज्यात सुरेश इंद्रजीत, अनिता भिलाव, पुंडलिक पाटील, ज्योतीबाई साळवे, सुरेखाबाई ढोडरे, विजय पाटील, भाऊराव ढोडरे, अरविंद कुवर, नरहर ठाकरे, नीलिमा जाधव, दयानंद चव्हाण, सुरेश पाटील, मंगेश पाटील, मोहन शेवाळे, किशोर सामुद्रे, गौतम बोराळे, नंदूगिर गोसावी, सुनीता पवार, रहीम पटेल, जुल्फेकार तेली, मनोज जोहरी आदींचा समावेश होता.

बोरद येथील उत्सव समितीने या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले होते. या कार्यक्रमाला परिसरातील शेकडो श्रोत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा संगीतमय गौरव अनुभवला.

म्हसावद जि.प.शाळेतील ४ थीच्या विद्यार्थिनींना निरोप

■ **म्हसावद, ता.शहादा । वार्ताहर -**

येथील जि.प.मुलींच्या शाळेत इयत्ता ४ थी च्या विद्यार्थिनींचा निरोप समारंभ, स्नेह संमेलन आणि स्नेह भोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच युवराज ठाकरे, प्रमुख पाहुणे म्हणून श्री. साईबाबा भक्त मंडळ म्हसावद टस्ट्रचे चेअरमन संजय पाटील, केंद्रप्रमुख पराग चव्हाण, केंद्रमुख्याध्यापक पंडीत रावताळे, मुख्य अतिथी म्हणून सती गोदावरी माता विद्यालय म्हसावदच्या मुख्याध्यापिका सुरेखा गुजर, पर्यवेक्षिका संगिता जयस्वाल, सेंट्रल बँकेच्या शाखाधिकारी जयश्री रामुगडे, ग्रा.पं.अधिकारी बी. पी. गिरासे, कोरीयोग्राफर सुनिल पवार, अतिष चौधरी, अनमोल पाडवी, ग्रा.पं.सदस्य चितांमण लांडगे, रोहिदास भिल, सचिन पावरा, शाळा व्यवस्थापन समितीचे

अध्यक्ष ईश्वर शिरसाठ, अंगणवाडी सेविका कल्पना साबरे, सरला चांभार, सुनिता पेंढारकर, सुनिता वडार उपस्थित होते. सर्व निरोपार्थी विद्यार्थिनींना लंच बॉक्स भेट म्हणून देण्यात आला. मुख्याध्यापक रविंद्र बैसाणे यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा देत भावनिक वातावरण निर्माण केले. इ. ४ थी तील कु. पायल मालचे, तन्वी अहिरे, प्रतिभा मालचे, हर्षदा वडार, पल्लवी अहिरे, तनु सामुद्रे, भुमिका ठाकरे, आणि विद्यार्थ्यींनींनी आपले अनुभव भावना बोलून दाखविल्या. शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये विविध खेळ, प्रश्नमंजुषा आणि सांस्कृतिक कार्यक्रम झाले. यावेळी शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मुख्याध्यापक रविंद्र बैसाणे यांनी केले. आभार ममता अहिरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी इरेशा आजुरे, ममता अहिरे, ज्योती मोरे, प्रियंका मोरे, मोना सोनवणे, स्वयपाकी व मदतनिस लक्ष्मीबाई माळी, मायाबाई शिरसाठ यांनी परिश्रम घेतले.

कन्येने दिला पित्याच्या पार्थिवाला मुखाग्नी

■ **खेतिया । वार्ताहर -**

प्रकाशा (ता.शहादा) येथील शिवशक्ती नगर येथील रहिवासी संजय शिवदास पटेल (वय ५३ वर्ष) यांचे दि.२७ एप्रिल रोजी रात्री निधन झाले. दि.२८ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८ वाजता प्रकाशा येथील केदारेश्वर येथे अंत्यविधी करण्यात आली. पारंपारिक जोखंड झुगारून अकाली निधन झालेल्या आपल्या वडिलांना मुलीद्वारे खांदा व मुखाग्नी देत प्रकाशा येथे एक वेगळा पायंडा पाळण्यात आला. यावेळी जागृती हिने आपल्या वडिलांना मुखाग्नी व खांदा दिला. २१ वर्षीय जागृती संजय पटेल हिने आपल्या वडिलांना मुखाग्नी व खांदा

देऊन मुलाचे कार्य ह्या मुलीने पूर्ण केले. प्रकाशा येथे अंत्यविधीसाठी ही उपस्थित राहून संपूर्ण पूजाविधी केली. मुलगा नसला तरी मूलीही मुलाचे सर्व जबाबदारी पूर्ण करू शकते याचे उदाहरण आज सर्वांसमोर दिसले. जागृती हीने बी.एसएसी (कम्प्यूटर) पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. स्व.संजय शिवदास पटेल यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगी, २ भाऊ, भावजयी, बहिणी असा परिवार आहे. ते अशोक पटेल यांचे लहान भाऊ, कृष्णदास पटेल यांचे मोठे भाऊ, डॉ.दिगंबर पाटील यांचे शालक तर विपूल पटेल, स्वप्नील पटेल, उज्वल पटेल, तेजस पटेल यांचे काका होत.

शेताच्या बांधावर अनोळखी मृतदेह आढळला

■ **नंदुरबार । प्रतिनिधी**

शेताच्या बांधावर झाडाखाली अनोळखी इसम मृतावस्थेत आढळून आल्याची घटना राकसवाडा शिवारात घडली. याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

नंदुरबार तालुक्यातील राकसवाडा गावाच्या शिवारात शेतीच्या बांधावर असलेल्या लिंबाच्या झाडाखाली एक अनोळा पुरूष मृतावस्थेत आढळून आला अंदाजे ५५ वर्ष असून डोक्यावर व दाढीचे केस काळे व पांढरे अंगात पांढऱ्या रंगाचा फुलबाहिचा शर्ट, राखाडी रंगाचा बनियान, शरीराने सडपातळ, चेहरा गोल, रंग सावळा, उंची पाच फुट सहा इंच असे वर्णन ओ. याबाबत दिलीप भुलाजी पाटील यांनी नंदुरबार तालुका पोलीस इाण्यात खबर दिली आहे. त्यानुसार अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून तपास पोलीस उपनिरीक्षक अण्णाभाऊ रेवगडे करीत आहेत.